**(CNR No.MHSN020040122019)**

# दिवाणी किरकोळ अर्ज क्र.११६/२०२० मधील
# नि.२५ खालील आदेश

अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. उभयपक्षाचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील बेलिफ अहवाल नि.क्र.२१ चे अवलोकन केले असता गैरअर्जदार क्र.१ई ला नोटीस न बजावता दि.०५/०७/२०२५ रोजी परत आलेली असल्याचे दिसून येते.

२. अभिलेखावरील बेलिफ अहवाल नि.क्र.१९ चे अवलोकन केले असता गैरअर्जदार क्र.१क ला नोटीस न बजावता दि.१८/०९/२०२३ रोजी परत आलेली असल्याचे दिसून येते.

३. अभिलेखाचे अवलोकन केले असता गैरअर्जदार क्र.१अ व १ड चे नोटीसचा अहवाल प्राप्त झालेला नसल्याचे दिसून येते.

४. वि.दि.दा.क्र.९३/२०१५ हा वाटप होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदाराची गैरअर्जदार क्र.१अ ही आई असून १क ते १ई या बहिणी आहेत. तरीदेखील अर्जदाराने मुळ दाव्यात नमूद प्रतिवादींचे अचूक पत्ते देवून त्यांना समन्सची बजावणी झालेली नसल्यामुळे दावा काढून टाकण्यात आलेला आहे. प्रस्तुत अर्जात सदर बाबीची पुनरावृत्ती झालेली असल्याचे दिसून येते. दि.०३/०७/२०२४ व दि.१८/०९/२०२३ पासून अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१अ, १क ते १ई विरुध्द अचूक पत्ता देवून पाऊल उचलेले नाही. तेव्हापासून प्रकरण गैरअर्जदारांविरुध्द पाऊल उचलण्यासाठी प्रलंबित आहे. यावरून अर्जदाराची वाजवी तत्परता (Due Diligence) दिसून येत नाही. आजरोजी देखील अर्जदाराने अर्जासोबत शपथपत्र

घालून नमूद गैरअर्जदारांचे अचूक पत्ते असल्याचे ठामपणे सांगितलेले नाही. यावरून अर्जदाराची प्रकरण चालविणेमध्ये वाजवी तत्परता (Due Diligence) दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदारास प्रस्तुत प्रकरण चालविण्यात रस नसल्याचे दिसून येते. वरील बाबी व प्रकरणाचे स्वरूप विचारात घेता अर्ज समर्थनीय नसल्यामुळे नामंजूर होणेस पात्र आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च अर्जदाराने स्वतः सोसावा.

SHAKTI UTTAMRAO DESHMUKH

Digitally signed by SHAKTI UTTAMRAO DESHMUKH
Date: 2025.12.08 18:00:44 +0530

सांगली. (श. उ. देशमुख)

दि.०८/१२/२०२५ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सांगली

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | ***K. U. Nadaf*** |
| Court | : | Civil Judge Sr.Dn., Sangli. |
| Date of order/judgment | : | 08/12/2025 |
| Signed by the Presiding Officer on | : | 08/12/2025 |
| Uploaded on | : | 08/12/2025 |